सकाळ » TODAY
नाशिक, सोमवार, ६ सप्टेंबर २०२१ ३

# तणाव निवारणासाठी संगीताचे योगदान

## डॉ. धर्माधिकारी : ऑर्केस्ट्रा असोसिएशनकडून आदर्श संगीत शिक्षक पुरस्कार

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ५ : संगीत हे जीवनाचा अविभाज्य घटक असून आपल्या जीवनातील ताण तणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी संगीत, गायन, वादन यांचे फार मोठे योगदान आहे. या कलेचा पुरस्कार मिळणे कौतुकास्पद असून संगीत शिक्षकांनी जास्तीत जास्त ज्ञानदान करून विद्यार्थी घडवावे, असे प्रतिपादन प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी यांनी केले. नाशिक जिल्हा ऑर्केस्ट्रातर्फे शिक्षक दिनानिमित्त रविवारी (ता.५) अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या सभागृहात आदर्श संगीत शिक्षक पुरस्कार नंदकुमार देशपांडे यांना डॉ. धर्माधिकारी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.



**नाशिक : नंदकुमार देशपांडे यांना संगीत शिक्षक पुरस्कार प्रदान करताना डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी, सुनील ढगे, उमेश गायकवाड आदी.**

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष उमेश गायकवाड यांनी संस्था दरवर्षी हा पुरस्कार देणार असून संगीत शिक्षकांना प्रोत्साहन देण्याचे कांम संस्था करीत आहे. तसेच पुरस्कारच नाही तर इतर वेळी ही संस्था सभासदांना मदत करण्यास तत्पर असल्याचे नमूद केले. ढोलकी वादक व असो.चे सभासद राजेंद्र उबाळे यांचे कोरोनाने निधन झाल्याने त्यांच्या पत्नीला आणि सक्सोफोन वादक महेश गुरव यांना त्यांच्या शस्त्र क्रियेसाठी धनादेशाद्वारे आर्थिक मदत देण्यात आली. पुरस्कार प्राप्त नंदू देशपांडे यांनी नाशिक जिल्हा ऑर्केस्ट्रा असोसिएशनच्या वतीने केलेला गौरव अविस्मरणीय असल्याचे सांगून आभार व्यक्त केले.

सचिव सुनील ढगे यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देऊन पुरस्काराचे स्वरूप स्पष्ट केले. दरवर्षी हा पुरस्कार निवड समिती मार्फत निवड करून ऑर्केस्ट्रा असोसिएशनच्या सभासदांमधून दिला जाणार आहे. संगीत शिक्षकांसाठी पुरस्कार देण्याची संकल्पना कमलेश शिंदे यांनी मांडली. अशोका बिल्डकॉनचे संचालक श्री. लोंढे यांनी कलाकारांसाठी दिलेले किराणा किटचे वाटप यावेळी करण्यात आले. रवींद्र बराथे यांनी सूत्रसंचालन केले.

यशस्वितेसाठी नाशिक जिल्हा ऑर्केस्ट्रा असोसिएशनचे अध्यक्ष फारुक पीरजादे, उपाध्यक्ष गोकूळ पाटील, कार्याध्यक्ष कमलेश शिंदे, सचिव सुनील ढगे, सहसचिव मंदार पगारे यांचेसह समितीने परिश्रम घेतले.

Scanned by CamScanner